दै सकाळ 28/7/2017

# आक्षेप, हरकतींवर आज सुनावणी

## महापालिका निवडणूक, मुंबईहून प्राधिकृत अधिकारी येणार

**नांदेड, ता. २७ (बातमीदार) :** महापालिकेच्या निवडणुकीसाठी काढण्यात आलेल्या प्रभाग रचना व आरक्षणाच्या सोडतीसंदर्भात दाखल करण्यात आलेल्या ८२ आक्षेप आणि हरकतींवर शुक्रवारी (ता. २८) सुनावणी होणार आहे. त्यासाठी मुंबईहून प्राधिकृत अधिकारी म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाचे सदस्य सचिव संतोष कुमार येणार आहेत.

महापालिकेची येत्या आक्टोबर महिन्यात निवडणूक होत असून त्यासाठी सोमवारी (ता. १०) प्रभाग रचना व आरक्षण काढण्यात आले. त्यानंतर महापालिकेच्या प्रारूप प्रभाग रचनेची अधिसूचना मंगळवारी (ता. ११) शासन राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आली व त्यावर हरकती व सूचना सादर करण्याचे आवाहन केले होते. त्यानुसार नऊ दिवसांत ८२ आक्षेप व हरकती दाखल झाल्या होत्या.

आता त्यावर शुक्रवारी सकाळी साडेदहा वाजल्यापासून महापालिकेच्या मुख्य इमारतीतील स्थायी समितीच्या सभागृहात सुनावणी होणार आहे. याबाबत संबंधित ८२ जणांना सुनावणीला उपस्थित राहण्यासाठी नोटिसीद्वारे कळविण्यात आल्याची माहिती निवडणूक विभागाकडून देण्यात आली.

आक्षेप व हरकतीवरील सुनावणीसाठी मुंबईहून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे सदस्य सचिव संतोष कुमार प्राधिकृत अधिकारी म्हणून येत आहेत. सुनावणीसाठी १५ गट तयार करण्यात आले असून प्रत्येकाला आपले म्हणणे मांडण्यासाठी वेळ देण्यात येणार असल्याची माहितीही या वेळी देण्यात आली. प्रभागाच्या रचनेवर, लोकसंख्या आणि मतदारांच्या संदर्भात तर काहींनी आरक्षणासंदर्भात दावे व हरकती सादर केल्या आहेत.

दै लोकअपेक्षा

# मनपाची प्रारूप मतदार यादी १९ ऑगस्टला प्रसिद्ध होणार

नांदेड – वाघाळा महानगरपालिकेचे सार्वत्रिक निवडणूकीसाठी १९ ऑगस्ट १७ रोजी प्रभागनिहाय प्रारूप मतदार यादया प्रसिध्द केल्या जाणार असल्याची माहिती राज्य निवडणुक आयुक्त ज.स.सहारिया यांनी दिली. नांदेड वाघाळा महानगरपालिकेची मुदत ३० ऑक्टोबर रोजी संपत असल्याने निवडणुकिची तयारी सुरू आहे. या भागात निवडणुक आयोगाने १ जुलै २०१७ रोजी प्रसिद्ध केलेली विधानसभेची मतदार यादी ग्राह्य धरण्यात येणार आहे. तिचे प्रभाग निहाय विभाजन करून १९ऑगस्ट २०१७ रोजी प्रारूप मतदार यादया तयार केल्या जातील. त्या दिवसापासून २८ ऑगस्ट २०१७ पर्यंत या यादयावर हरकती व सूचना दाखल करता येतील. अंतिम मतदार याद्या ७ सप्टेंबर २०१७ रोजी प्रसिद्ध केल्या जातील. त्याच दिवशी मतदान केंद्राची यादी तसेच प्रभागनिहाय व मतदान केंद्र निहाय मतदार यादयाही प्रसिद्ध केल्या जातील. प्राप्त होणाऱ्या हरकती व सुचनांच्या अनुशंगाने लेखनिकांच्या चूका असल्यास किवा विधानसभेच्या मतदार यादीत नाव असूनही प्रभागनिहाय मतदार यादीत नाव नसल्यास अशा चुकांबाबत कार्यवाही केली जाईल. तसेच मतदान केंद्राची यादी प्रसिद्ध करण्यापूर्वी संबंधीत मतदान केंद्रांवरिल सेवासुविधाची खात्री करण्याबाबत सुचना देण्यात आल्या आहेत. मतदान केंद्रे तळमजल्यावर असावीत अपवादात्मक स्थितीत पहिल्यामजल्यावर असल्यास उद्वाहक (लिफ्ट) किंवा डोलीची व्यवस्था करावी वीज, पिण्याचे पाणी, प्रसाधनगृह ,सावली ,दिव्यांगांसाठी रॅम्प,व्हील चेअर इ. सुविधा देखील उपलब्ध करून देण्याचे आदेश दिले आहे. असेही सहारिया यांनी सांगितले.

दै चांदे [illegible]

# नांदेड- वाघाळा महानगरपालिकेची प्रारूप मतदार यादी १९ ऑगस्टला

नांदेड (प्रतिनिधी) : नांदेड- वाघाळा महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसह बृहन्मुंबई, नागपूर, पुणे आणि कोल्हापूर महानगरपालिकेतील सहा रिक्त पदांच्या पोटनिवडणुकांसाठी १९ ऑगस्ट २०१७ रोजी प्रभागनिहाय प्रारूप मतदार याद्या प्रसिद्ध केल्या जाणार असल्याची माहिती राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया यांनी आज येथे दिली.

श्री. सहारिया यांनी सांगितले, की नांदेड- वाघाळा महानगरपालिकेची मुदत ३० ऑक्टोबर २०१७ रोजी संपत असल्याने निवडणुकीची तयारी सुरू आहे. त्यासाठी भारत निवडणूक आयोगाने १ जुलै २०१७ रोजी प्रसिद्ध केलेली विधानसभेची मतदार यादी ग्राह्य धरण्यात येणार आहे. तिचे प्रभागनिहाय विभाजन करून १९ ऑगस्ट २०१७ रोजी प्रारूप मतदार याद्या प्रसिद्ध केल्या जातील. त्या दिवसापासून २८ ऑगस्ट २०१७ पर्यंत या याद्यांवर हरकती व सूचना दाखल करता येतील. अंतिम मतदार याद्या ७ सप्टेंबर २०१७ रोजी प्रसिद्ध केल्या जातील. त्याच दिवशी मतदान केंद्रांची यादी; तसेच प्रभागनिहाय व मतदान केंद्रनिहाय मतदार याद्याही प्रसिद्ध केल्या जातील.

रिक्तपदांसाठी मतदार याद्या

महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक ११६, नागपूर महानगरपालिका प्रभाग क्रमांक ३५अ, कोल्हापूर महानगरपालिकेचा प्रभाग क्र. ११ व ७७ आणि पुणे महानगरपालिकेचा प्रभाग क्रमांक २१अ व ३९अ या जागा रिक्त आहेत. या सहापैकी तीन जागा सदस्यांच्या निधनामुळे; तर तीन जागा संबंधित सदस्यांचे जातप्रमाणत्र अवैध ठरल्याने रिक्त झाल्या आहेत. या रिक्तपदांच्या पोटनिवडणुकांसाठी देखील प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे, असे त्यांनी सांगितले. प्राप्त होणाऱ्या हरकती व सूचनांच्या अनुषंगाने लेखनिकांच्या चुका असल्यास, प्रभाग बदलला असल्यास किंवा विधानसभेच्या मतदार यादीत नाव असूनही प्रभागनिहाय मतदार यादीत नाव नसल्यास अशा चुकांबाबत कार्यवाही केली जाईल; तसेच मतदान केंद्रांची यादी प्रसिद्ध करण्यापूर्वी संबंधित मतदान केंद्रांवरील सेवासुविधांची खात्री करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. मतदान केंद्रे तळमजल्यावर असावीत. अपवादात्मक स्थितीत पहिल्या मजल्यावर असल्यास उद्वाहन (लिफ्ट) किंवा डोलीची व्यवस्था करावी. वीज, पिण्याचे पाणी, प्रसाधनगृह, सावली, दिव्यांगांसाठी रॅम्प, व्हीलचेअर इ. सुविधादेखील उपलब्ध करून देण्याचे आदेश दिले आहेत, असेही श्री. सहारिया यांनी सांगितले.

28-07-2017